# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

बायपास रोड, कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दुरध्वनी ०७२१-२६६२२९३ फॅक्स ०७२१-२६६२७८३
ईमेल : dycomm.amt@gmail.com वेबसाईट : http://amravatidivision.gov.in

क्र.आस्था/विकास/झेडएनजी-ग्रामपं/कावि-४७२-/२१ दिनांक / फेब्रुवारी, २०२१
08 मार्च 2021

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद
अमरावती / अकोला / यवतमाळ / बुलडाणा / वाशिम.

विषय :- जिल्हा परिषदेमधील रिक्त असलेल्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी पदांच्या अतिरिक्त कार्यभाराबावत.

संदर्भ :- वि.गो.चांदेकर उप सचिव ग्रामविकास विभाग मुंबई यांचे पत्र क्र.जिपअ-२०२१/प्र.क्र.०३/आस्था-४, दि.११.०१.२०२१.

उपरोक्त विषयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे अर्ध शासकीय पत्र दि.१७.१२.२०२० अन्वये प्रत्येक जिल्हयात विभागाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील संशोधन अधिकारी हे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संवर्गातील असतात. सबब, जिल्हा परिषदेतील रिक्त असलेल्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी पदांचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषदेतील इतर अधिकाऱ्याकडे न सोपविता विभागाच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील संशोधन अधिकारी यांच्याकडे सोपवून त्यास कार्योत्तर मंजूरी घेण्याबातचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे तात्काळ सादर करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये अर्ध शासकीय पत्रातील प्रधान सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांच्या विनंतीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबतची दक्षता घेण्याची कार्यवाही करणेकरीता विभागीय स्तरावर कळविले आहे.

करीता, प्रस्तुत प्रकरणी प्राप्त शासन पत्रासोबत प्राप्त अर्ध शासकीय पत्रात दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेतील जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या रिक्त पदांची माहिती घेवून ज्या ठिकाणी पद रिक्त आहे अशा रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषदेतील इतर अधिकाऱ्यांकडे न सोपविता विभागाच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील संशोधन अधिकारी यांच्याकडे सोपवून त्यास कार्योत्तर मंजूरी घेण्याबातचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे तात्काळ सादर करावा.

**सहपत्र** :-संदर्भिय शासन पत्रे..

(पीयूष सिंह)
विभागीय आयुक्त,
अमरावती